दिनांक 9 ऑगस्ट 2024 रोजी महाराष्ट्र पशु आणि मत्स्य विज्ञान विद्यापीठ अंतर्गत असलेल्या कृषी विज्ञान केंद्र दूधबर्डी मार्फत प्रताप माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालय, तालुका कळमेश्वर जिल्हा नागपूर येथे "दुग्ध जागृती अभियान"अंतर्गत शालेय विद्यार्थ्यांना  मानवी आहारात दुध आणि दुग्धजन्य पदार्थांचे महत्त्व तसेच दुधाचे पोषणमूल्य या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री प्रवीण श्रीखंडे यांनी सदर कार्यक्रमास परवानगी देऊन सहकार्य केले, या कार्यक्रमात वर्ग 9 वी व 10 वी हया वर्गातील  एकूण 65 विद्यार्थी व विद्यालयाचे 10 शिक्षक यांनी सहभाग नोंदवला. सदर कार्यक्रमाचे आयोजन डॉ. श्वेता लेंडे विषय विशेषज्ञ, कृषी विज्ञान केंद्र डॉ. गजानन अंभोरे, विषय विशषज्ञ, कृषी विज्ञान केंद्र यांनी केले. सदर कार्यक्रमात डॉ. शितल चोपडे, सहाय्यक प्राध्यापक, पशुपोषण शास्त्र विभाग, नागपूर पशुवैद्यक महाविद्यालय नागपूर यांनी  देखील विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.